# प्रेस नोट

## पोलीस आयुक्त,अमरावती शहर आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती 2021

## -: उमेदवारांकरीता सुचना :-

पोलीस आयुक्त,अमरावती शहर या आस्थापनेवर 20 पोलीस शिपाई पदाकरीता पोलीस भरती प्रक्रीया सुरु असुन सदर पोलीस भरतीमधील 222 उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक 2.4.2023 रोजी सकाळी 8.30 ते 10.00 वा.पर्यंत **विद्याभारती महाविद्यालय,सी.के.नायडु रोड कॅम्प अमरावती** या परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार असुन उमेदवारांनी लेखी परीक्षेकरीता 2(दोन) तास अगोदर म्हणजेच सकाळी 06.30 वाजता विद्याभारती महाविद्यालय,सी.के.नायडु रोड कॅम्प अमरावती येथे हजर राहावे, जे उमेदवार परीक्षेकरीता दिलेल्या वेळेत हजर राहणार नाही त्यांना लेखी परीक्षेकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

तसेच लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन प्रवेशपत्र देण्यात येणार असुन उमेदवारांनी लेखी परीक्षेकरीता येतांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र, शासकीय ओळखपत्र व आधारकार्ड सोबत आणावे. ज्या उमेदवारांना महाआयटी विभागाकडुन लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र प्राप्त होणार नाही, त्या उमेदवारांनी नियंत्रण कक्ष,अमरावती शहर येथील दुरध्वनी क्रमांक 0721-2551000 वर संपर्क साधुन त्यांच्या नावासह व चेस्ट क्रमांकासह तक्रार नोंदवावी.

तसेच पोलीस भरतीची लेखी परीक्षा ही ,नि:पक्षपातीपणे व पारदर्शकपणे होणार असुन उमेदवारांनी लेखी परीक्षेच्या वेळी कोणताही गैरमार्गाचा अवलंब करु नये, तसेच उमेदवारांनी लेखी परीक्षेकरीता येतांना मोबाईल,स्मार्ट वॉच व इतर आक्षेपार्ह वस्तु स्वत: जवळ बाळगु नये. गैरमार्गाचा अवलंब करतांना आढळुन आल्यास त्या उमेदवाराला लेखी परीक्षेकरीता अपात्र ठरविण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

( नवीनचंद्र रेड्डी )<br>
पोलीस आयुक्त,अमरावती शहर

प्रति,

मा. संपादक,<br>
दैनिक-------------------------<br>
अमरावती

२/- कृपया सदरची प्रेस नोट जनहितार्थ असल्याने आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी. ही विनंती.

Scanned with OKEN Scanner